ISSN 2319-8648

UGC Approved Journal
Sr. No. 64310

Impact Factor - 2.143

Pre-Reviewed

Indexed (IIJIF)

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

**Special Issue**

**Issue I, Vol II 10th March 2018**

**Godavari Manar Charitable Trust's**

## Arts, Commerce & Science College, Shankarnagar

**Tq. Biloli, Dist. Nanded**

**(NAAC Re-accredited 'B' Grade with CGPA 2.31 & ISO- 9001-2008)**

**One Day Interdisciplinary National Conference**
**on**

## Globalization and Welfare States: Problems and Prospects

**Jointly Organized by**
**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded**
**&**
**Public Administration Association Maharashtra**

**Organized by**
**Department of Public Administration**
Arts, Commerce & Science College, Shankarnagar

**Editor In Chief**
**Mr. Arun B. Godam**
**Latur.**

**Convener**
**Dr. B. S. Pimple**
Principal, ACS College, Shankarnagar &
President, Public Administration Association Maharashtra

**Co-Convener**
**Dr. S. K. Lekhane**
(HOD Pub. Adm.)

**Coordinator**
**Dr. A. C. Sonkamble**
(Asso. Prof. Pub. Adm.)

| | | | |
|---|---|---|---|
| 54 | जागतिकीकरणाचे सामाजिक दुष्परिणाम | प्रा.डॉ. अशोक काकासाहेब जाधव | 164 |
| 55 | जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय | डॉ. संजय काळे | 167 |
| 56 | जागतिकीकरणाचा राज्यव्यस्थेवर व प्रशासनावर होणारा परिणाम | डॉ. रेखा ग. हिंगोले / माने | 170 |
| 57 | जागतिकीकरणाचा आरक्षण धोरणावरील परिणाम | प्रा.संजय कांबळे | 172 |
| 58 | जागतिकीकरण आणि भारतातील शिक्षण | प्रा. डॉ. वसंत पांडुरंग सरवदे | 176 |
| 59 | जागतिकीकरणाचा लोकप्रशासनावरील प्रभाव | डॉ.सी.एम.कहाळेकर<br>डॉ. एस. एन. कबाडी | 178 |
| 60 | जागतिकीकरण आणि आर्थिक विषमता | प्रा. डॉ. आनंद शिंदे | 181 |
| 61 | कल्याणकारी राज्यात समाजकल्याणाचे महत्व | प्रा.डॉ.एस.एस.शिंदे | 184 |
| 62 | जागतिकीकरण व सामाजिक न्याय | डॉ. डी. एल. बंजारा | 187 |
| 63 | जागतिकीकरणाचे नागरी समाजावर झालेले परिणाम - एक समाजशास्त्रीय अध्ययन. | डॉ.दत्ता मा. तंगलवाड | 190 |
| 64 | जागतिकीकरण,उच्च शिक्षण व सामाजिक न्याय | प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर | 195 |
| 65 | जागतिकीकरण आणि आरक्षण धोरण | प्राचार्य डॉ.पिंपळे बी.एस.<br>प्रा.दीक्षित एस.डी. | 199 |
| 66 | समाज कल्याण प्रशासन व महिला कल्याण<br>विशेष संदर्भ राष्ट्रीय महिला धोरण-2016 | प्रा.विजय लक्ष्मण तरोडे | 202 |
| 67 | नोकरदार महिलांच्या समस्या | डॉ.व्यंकट विळेगावे ,<br>डॉ.नागनाथ कळबंडे | 205 |
| 68 | जागतिकीकरणाचा डिजिटल ग्रंथालयावरील प्रभाव | डॉ. विवेक विष्णुदास जाधव | 208 |
| 69 | जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय | प्रा. राम थोरात<br>प्रा. वाघमारे एस.एन. | 210 |







| | | | |
|---|---|---|---|
| 70 | जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय | डॉ.रमेश वाघमारे | 212 |
| 71 | "जागतिकीकरण आणि स्त्री शिक्षण" | श्री. एच.एम.वांकर | 215 |
| 72 | जागतिकीकरण : कल्याणकारी राज्य आणि समाजकल्याण प्रशासन | सुशिलकुमार श्रीराम शिंदे<br>शिवराज कल्याणराव लाखे | 218 |
| 73 | जागतिकीकरण, कल्याणकारी राजकारण आणि दुर्बल घटक | डॉ.शिवाजी सोमला पवार | 222 |
| 74 | जागतीकीकरण व आरक्षण धोरण | डॉ.पगडे जी.आर. | 227 |
| 75 | जागतिकीकरण - सामाजिक न्यायावरिल अरिष्ट | डॉ. संतोष सुधाकरराव कोदुरवार | 229 |
| 76 | **जागतिकीकरण आणि शेती** | भगवान शंकरराव देशमुख | 231 |
| 77 | "भारतातील जागतिकीकरणाच्या काळात सामाजिक न्यायाच्या दृष्टीने सामाजिक सुरक्षेची स्थिती – एक अवलोकन" | प्रा. डॉ. चंद्रशेखर गित्ते | 233 |
| 78 | "जागतिकीकरणाचा डिजिटल ग्रंथालयावर प्रभाव " | राजकुमार ग.बोंडे | 237 |
| 79 | कल्याणकारी राज्य व भारतातील समाजकल्याण प्रशासन एक दृष्टिक्षेप | डॉ. मोरे एम.आर.<br>कुकडे वाय. एच. | 240 |
| 80 | जागतिकीकरण व सामाजिक न्याय | संतोष गुट्टे | 245 |

# जागतिकीकरणाचा लोकप्रशासनावरील प्रभाव

डॉ.सी.एम.कहाळेकर
लोकप्रशासन विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड
डॉ. एस. एन. कबाडी
रसायनशास्त्र विभाग प्रमुख, क. वा. व वि. महाविद्यालय, शंकरनगर

------------ (59) ------------

**प्रस्तावना :-**

आजच्या युगाव विकसीत तंत्रज्ञानामुळे जलद संसूचनाच्या सोयी उपलब्ध झालेल्या असल्यामुळे आज जग लहान झाले आहे. जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातील माहिती मिळविण्यासाठी संपर्क साधने सर्व काही शक्य आहे. म्हणून आज प्रशासनाला यश प्राप्त झाल्याचे दिसून येते आणि प्रशासन हे कोणत्याही राष्ट्रातील असो ते जागतिकीकरणापासून अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे आज देशाचे परस्परांशी मैत्रीचे व व्यापाराचे संबंध वेगाने प्रस्थापीत होत आहेत. तंत्रज्ञानाच्या विकासामुळेच जागतिकीकरणाची संकल्पना विकसीत होत असलेली दिसून येते. जागतिकीकरणाचा प्रवास हा एकीकृत विश्व बाजारपेठेच्या दिशेने होत आहे. जागतिकीकरण हे राष्ट्रामधील आर्थिक, सामाजिक, व्यापारी, सांस्कृतिक, विज्ञान तंत्रज्ञान व तसेच लोकप्रशासनामध्ये १९९५ साली विश्व व्यापार संघटना स्थापन झाली व त्यातील प्रत्येक सदस्यांना Most Favoured Nation चा दर्जा मिळाला म्हणून जागतिकीकरणाची प्रक्रिया गतीशील झालेले दिसून येते आणि १९९१ पासून जागतिकीकरणाची प्रक्रिया भारतात सुरुवात झाली आहे. जागतिकीकरण प्रक्रियेमध्ये भारतीय बाजारपेठ परकीय गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यात यशस्वी ठरली आहे. त्यामुळे भारतातील परकीय गुंतवणुक वाढत आहे. आज प्रत्येक राष्ट्राने जागतिकीकरण स्विकारलेले दिसते.

वास्तविक पाहता लोकप्रशासन हे अत्यंत पुरातन आहे त्यात नवे असे काही नाही. परंतु अभ्यास व संशोधनदृष्टया त्यातील नाविन्य नवलोकप्रशासनाचे जनक आहे. प्राचीन शास्त्र हे प्रशासनाला महत्व देणारे होते. तर नवीन शास्त्र लोकांना प्राधान्य देणारे आहे अशा जुन्यातील काही अभावांनी नवलोकप्रशासनाचा अभ्यास सुरु करण्यास जागतिकीकरणामुळे मिळालेली आहे असे म्हटल्यास चूक ठरणार नाही. जागतिकीकरणानंतर भारतीय प्रशासनात लोकशाहीच्या अनुषंगाने कल्याणकारी राज्य, समाजवादी समाजरचना, व्यक्तीविकास, धर्मनिरपेक्षता, प्रजासत्ताक या संर्कल्पनांचा अंगीकार करुन लिखीत राज्यघटनेच्या उद्देशपुर्तीसाठी देशाला अनुकूल अशी समाजवादी अर्थव्यवस्था स्विकारली गेली ज्यात भांडवलशाही आणि साम्यवादी अर्थव्यवस्थेतील दोष टाळून व्यक्ती स्वातंत्र्याचा उंचीत आदर आणि आर्थिक सत्तेचे न्यायीक विकेंद्रीकरण करणारी अर्थव्यवस्था स्विकारली गेली.

जागतिकीकरणाचा विचार करताना प्रथम त्याचा अर्थ समजून घेणे महत्वाचे ठरते. जागतिकीकरणाला वैश्विकरण असा पर्यायी शब्द वापरला जातो. अनेकांनी जागतिकीकरणाच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी खालीलप्रमाणे :-

१) प्रा.सी.टी.कुरीयन :-

जागतिक अर्थव्यवस्था म्हणजे विविधता असलेल्या अर्थव्यवस्थांचा समूह होय. ज्यामध्ये निरनिराळ्या कार्यक्रमाने जे एकमेकांशी विविध मार्गांनी परस्परावर क्रिया करतात आणि अशा रितीन कालांतराने त्याच्या वृत्तीत बदल होतो. त्यास जागतिकीकरण असे म्हणतात.

२) रुसी मोदी :-

खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातुन उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे तसेच संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तू व सेवा यांची विक्री करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

**जागतिकीकरणात लोकप्रशासनाचे यश :-** जागतिकीकरणामुळे प्रशासनाच्या विविध अवस्था व विकासाचे स्वरुप लक्षात घेता वरील विवेचन केल्यानंतर त्याच्या अनुकूल व प्रतिकूल बाबींची चर्चा करणे सुध्दा महत्वपूर्ण ठरते कारण भारताने वेगवेगळ्या योजनांचा





किंवा धोरणांचा स्विकार केला आहे. म्हणून प्रशासनाने अलिकडच्या काळात जागतिक स्तरावरचा विचार केला किंवा धोरणाचा स्विकार केला त्याचे यश व अपयश ह्या दोन्ही गोष्टीचा विचार करणे महत्त्वपूर्ण ठरतो तो पुढीलप्रमाणे -

१) जागतिकीकरणामुळे प्रशासनाला आर्थिक विकासाबाबत प्रेरणा मिळते व प्रशासन स्वावलंबनाचा मार्ग स्विकारुन आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणतो.
२) प्रशासनाला जागतिक स्तराच्या माध्यमातून निगमाचा विस्तार किंवा कंपन्याचा विस्तार होत असल्यामुळे प्रशासनाला यश प्राप्त होते.
३) लोकांच्या प्रवृत्तीत बदल होतो कारण, जागतिकीकरणाचा प्रभाव प्रशासनावर पडला असल्यामुळे लोकांच्या प्रवृत्तीत बदल घडून आणण्यास प्रशासनाला यश आल्याचे दिसून येते.
४) प्रशासनाने जागतिकीकरणात बाजाराचे महत्तीकरण हे सर्वात जास्त महत्त्व प्राप्त करुन घेतलेले दिसून येते.
५) वित्तीय व्यवहाराने प्रभाविक् करण्यासाठी जागतिकरणाला नाकारता येत नाही म्हणून वित्तीय बाबतीत प्रशासनाला यश मिळाले.
६) निर्णय प्रक्रिया राष्ट्राकडून राष्ट्रसमुहाकडे घेऊन जाण्यास प्रशासनाला यश आले.
७) प्रशासनाला बहुराष्ट्रीय कंपन्याचे असित्व जागतिकीरणाच्या पार्श्वभूमीवर योगदान आहे. आर्थिक सत्तेच्या बळावर प्रशासन अशा कंपन्यांनी एकाच देशात उत्पादन करण्यापेक्षा अनेक देशात उत्पादन आणि व्यापाराचे कार्य केल्यास अधिक नफा प्रशासनाला मिळतो.
८) जागतिक व्यपराला नियंत्रित करणारी १९९५ मध्ये अमेरिकेत संघटना स्थापन करण्यात आली. जागतिकीकरणाच्या विकासात प्रशासनाची भूमिका ही महत्त्वाची आहे.
९) आधुनिक नियम व प्रणाली किंवा बाजारतंत्राला महत्त्व प्राप्त झाले. अशा बाबतीत सुद्धा प्रशासनाला यश मिळाले.
१०). प्रशासनाला जागतिकीकरणामुळे भांडवल व साधनांच्या उपलब्धतेच्या प्रमाणामध्ये वाढ होते.
११) इतरत्र सर्व जग ही एक बाजारपेठ व जागतिक ग्राहकांसाठी उत्पादन हे जागतिकीकरणात अभिप्रेत आहे
१२) बहुराष्ट्रीय कंपन्यांना त्यांच्या देशातील प्रवेशावरील नियंत्रण हटविणे याबाबत प्रशासन यशस्वी ठरले आहे.

अशा विविध प्रशासनाच्या यशस्वी परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणामुळे पडतो.

**जागतिकीकरणात लोकप्रशासनाचे अपयश :-**

सध्या जागतिकीकरण म्हणजे जगाच्या आर्थिक उत्क्रांतीच्या शेवटचा पर्याय मानला जातो या प्रशासकीय धोरण किंवा योजनांचा परिणाम प्रगत देशापेक्षा विकसनशील देशांना सोसावे लागतात.

ती अपयश खालीलप्रमाणे.

१) प्रशासकीय कार्यामुळे व जागतिकीकरणाच्या बदलामुळे कर्जबाजारीपणा वाढला म्हणून प्रशासनाला कर्जाच्या बाबतीत अपयश आला आहे असे म्हटल्यास चूक ठरणार नाही.
२) प्रशासनातील विकासाचा असमतोल मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येते.
३) नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होवून प्रशासनाला अपयश स्विकारावे लागले.
४) विकसनशील देशाचा तोटा जागतिकीकरणाने आयात-निर्यातीवरील कर खूपच कमी झाले असल्यामुळे औद्योगिक वस्तूचे आयातीवरील कर कमी करुन जागतिक व्यापार वाढला पण यामध्ये विकसीत स्पर्धा करणे कठीण असल्यामुळे त्याचा उद्योग अडचणीत सापडतो.
५) बहुराष्ट्रीय कंपन्याची मक्तेदारी विविध क्षेत्रात बहुराष्ट्री कंपन्यांचा राष्ट्रीय कंपन्यासारखी वागणुक द्यावी लागते. त्यामुळे जागतिकीकरणाचा अटळ परिणाम बहुराष्ट्रीय कंपनीशी मक्तेदारी निर्माण होण्याचा धोका असल्याचा दिसून येतो.

६) सांस्कृतिक विविधतेवर जागतिकीकरणामुळे अनिष्ठ परिणाम होत असल्यामुळे
७) जगातील विकसीत देशांने अर्थव्यवस्थेचा पुर्नविचार सुरु केला त्यात श्रीमंत राष्ट्राकडे नेतृत्व.
८) जागतिकीकरणाचा एक महत्वाचा अविष्कार म्हणजे बहूराष्ट्रीय कंपन्या करार कृषीव्यवस्था स्थापन्याचा प्रयत्न करीत आहे म्हणून शेतीवर अनिष्ठ परिणाम होत आहे.

**सारांश :-**

जागतिकरण ही जगातील आर्थिक एकीकरणाची प्रक्रिया आहे. अलीकडील काळातील जलद वाहतूक दळण-वळणांच्या सोयी माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार यामुळे जगातील कोणत्याही देशातील वस्तू व सेवा उत्पादन करणे व विकणे सहज शक्य झाले. अर्थात जागतिकरणाने विश्व अर्थव्यवस्था निर्माण होते. त्यांच्यात उदार आर्थिक संबंध निर्माण होतात.अर्थव्यवस्थेला बंदिस्ताकडून मुक्ततेकडे नेण्यास जागतिकीरण उपयुक्त ठरते. आंतरराष्टीय स्तरावर जागतिकीकरणाचा जो प्रभाव आहे, त्यामध्ये भारतावर पडलेला प्रभाव हा महत्वाचा प्रश्न आहे.

आज भारत सरकारचे धोरण पूर्णत: जागतिकीकरणाच्या धोरणाशी घट्ट जखडलेले आहे. जागतिकीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेला जगातील अन्य देशांच्या अर्थव्यवस्थेबरोबर जोडले आहे. भारत जागतिकीकरणाच्या माध्यमातून आपले राष्ट्रीय हित साध्य करण्यास प्रयत्नशील आहे. भारतीय प्रशासन दिवसेंदिवस अमेरिकेच्या खांद्याला खांदा लावीत चालले आहे. या जागतिकीकरणाचे भारतावर काय परिणाम होतील? हे परिस्थिती दाखविल. जागतिकीकरणाचा स्विकार/विचार केल्यानंतर भारतावर चांगले वाईट परिणाम होतील. परंतु काहीही झाले तरी आज कोणताही देश या जागतिकीकरणापासून अलिप्त राहू शकणार नाही याला साम्यवादी चीनसुद्धा अपवाद नाही. कारण चीनने पण जागतिकीकरणात सहभाग घेतला आहे. त्यामुळे आजचे युग हे जागतिकीरणाचेच युग आहे. कारण आज दळणवळणाच्या साधनांमुळे जग जवळ आले आहे व जगातील परस्पर देवाणघेवाण वेगाने होत असल्यामुळे हे जग एक जागतिक खेडे बनत आहेत. असेच आपणास म्हणवे लागेल.

लोकप्रशासनाच्या व्याप्तीबरोबरच प्रशासनाची व्याप्ती संघटना व राष्ट्र यांच्याहून विस्तृत झालेली आहे. या विस्तृत व्याप्तीशी जुळवून घेताना प्रशासनातील क्षेत्र कमी करणे आणि प्रशासकीय मुल्ये व नैतिकता आणणे हे आज जगातील सर्वच प्रशासकांपुढेच आव्हान आहे. असे म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

**संदर्भ :-**

१) लोकप्रशासनातील नवे विचार प्रवाह- प्रा. सुभाष भिंगे गौरवग्रंथ संपादक- डॉ.शंकर लेखणे, डॉ. येडले, डॉ. गंगणे
२) वित्तीय प्रशासन आणि सार्वजनिक धोरण - डॉ. एकंबेकर, प्रा. कहाळेकर, डॉ. सोनकांबळे
३) लोकप्रशासनातील नव-प्रवाह
४) लोकसत्ता
५) लोकराज्य
६) लोकप्रशासन POL३११ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक





# जागतिकीकरण आणि आर्थिक विषमता

**प्रा. डॉ. आनंद शिंदे**
के. बा. पा. ए. महाविद्यालय हणेगांव

(60)

जागतिकीकरण- उदारीकरण या संकल्पना आता आपल्या इतक्या अंगवळणी पडलेल्या आहेत की त्याबाबत संज्ञेच्या वा संकल्पनेच्या दृष्टीने वेगळी चर्चा करण्याची आवश्यकता उरलेली नाही. नव्वदीच्या दशकात स्वीकारलेल्या या प्रक्रियेचा भारत अविभाज्य भाग बनलेला आहे त्यामुळे त्याच्या गुण दोषा बाबतीची चर्चा किंवा मिमांसा आता कालबाह्य आणि अव्यहारिक ठरते. ज्या अपरिहार्य गरजेतून भारताने गॅट करारावर सह्या करुन ही प्रक्रिया स्वीकारली आहे त्यास आता जवळपास तीन दशक पूर्ण होत आहेत. त्यामुळे ते फायद्याचे वा तोट्याचे, उपयोगी वा निरपयोगी यास आता काही महत्व राहिलेले नाही. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत जागतिकीकरणाचा भारतीय दृष्टीने विविध व्यवस्था वा घटकांवर काय परिणाम होत आहेत. भविष्यात या आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेत भारतासाठी काय संधी आहेत वा धोके आहेत. भारताच्या हिताच्या दृष्टीने कालोचित काय बदल वा रणनिती अपेक्षित आहे याचा शोध घेणे संयुक्तीक ठरु शकते. स्वातंत्र्यानंतर देशाने स्वीकारलेल्या भारतीय संविधानाने नागरिकांस सामाजिक न्याय, सामाजिक परिवर्तन, समाजकल्याण यांची ग्वाही दिलेली आहे. सत्ता आणि संपत्तीच्या विकेंद्रीकरणासह समाजात सामाजिक आणि आर्थिक समानता प्रस्थापित करण्याचे अभिवचन घटनेच्या विविध कलमांत अंतर्भूत आहे. अशा स्थितीत जागतिकीकरणाच्या तथाकथित अपरिहार्यतेतून घटनेतील वरील मूल्यांना तिलांजली दिली जाणार नाही याबाबतीत भारतीय नागरिक म्हणून सजग राहणे अत्यंत आवश्यक ठरते. आर्थिक उदारीकरणाच्या मागील तीन दशकातील विकासाचा वेग आणि प्रवाह पाहता समाजात आणि अर्थव्यवस्थेत आलेला बदल लक्षणिय दिसून येत आहे. उदारीकरणामुळे जागतिक दर्जाचे नवनविन तंत्रज्ञान, भांडवल, विविध सेवा यांची बाजारात रेलचेल दिसून येत आहे. दळणवळण, वाहतूक यामध्ये कमालीची वृध्दी झाल्याचे दिसून येत आहे, नवनविन उद्योग व्यवसाय जागतिक दर्जाच्या अनेक कंपन्या भारतात येतआहेत थेट परकिय गुंतवणूकीमुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळून देशातील दरडोई उत्पन आणि सकल राष्ट्रीय उत्पन्नात मोठी भर पडलेली दिसते. विदेशी भांडवल भारतात यावे यासाठी मूक्ततेचे धोरण स्वीकारण्यात आले. त्यासाठी आवश्यक सवलती देऊन लायसन्स व परमिटराज संपवण्यात आले. अनेक क्षेत्रात ५१ टक्के पर्यंत थेट विदेशी गुंतवणुकीस मूभा देण्यात आली. पुढे ही मर्यादा ७४ टक्के पर्यंत वाढवण्यात आली. अलिकडे अनेक क्षेत्रात १०० टक्के गुंतवणुकीस मोकळीक देण्यात आली. एवढेच नाही तर संरक्षण क्षेत्रात सुध्दा विदेशी गुंतवणुकीसाठी मूभा देण्यात आलेली दिसते. आर्थिक सुधारणांच्या या विविध उपाय योजनात्मक धोरणांमुळे १९८० पर्यंत तीन-साडेतीन टक्क्यांच्या असापास रेंगाळणारा भारताचा विकास दर झपाट्याने वाढून आठ- दहा टक्क्यांपर्यंत पोहचला. परिणामी आजमितीस भारताची अर्थव्यवस्था जगातील दुसऱ्या क्रमांकाची वेगवान विकास करणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखल्या जाऊ लागली. आर्थिक सुधारणांच्या पर्वातील या सर्व जमेच्या बाजू नाकारता येणार नाहीत परंतु अर्थव्यवस्थेच्या या वाढीमध्ये गरीबांचा हिस्सा किती? हा प्रश्न अनुत्तरीत असल्याचे दिसून येते. वेगाने विकास करणाऱ्या अर्थव्यवस्थेत शेती व शेतीसंबंधित घटकांचे भवितव्य काय आहे? देशाच्या अर्ध्या लोकसंख्येचा सांभाळ करणाऱ्या आणि तितक्याच लोकांना रोजगार देणाऱ्या शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील घटता हिस्सा हा चिंतेचा विषय आहे. अन्न धान्याबाबत स्वयंपूर्ण असलेल्या किंबहुना अन्नधान्याची निर्यात करणाऱ्या भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे कोणत्या विकासाचे फलित समजावे? हा प्रश्न आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा १९५० च्या तुलनेत वर्तमान हिस्सा व्यस्त झाल्याचे दिसते. शेतीचे बदलते तंत्रज्ञान आणि परावलंबित्वाची स्थिती यामुळे या क्षेत्रातील स्वयंपूर्णता धोक्यात आल्याची दिसते. बाजारपेठेवर नसलेले शासकिय नियंत्रण आणि आदानांच्या वाढत्या किंमती यामुळे शेती तोट्याची बनत चालली आहे. चालु वर्षातील कापसावर झालेल्या बोंडआळीच्या प्रादूर्भावामुळे झालेल्या नुकसानी बाबत सरकार बियाने कंपन्याकडे बोट दाखवित आहे. कृषी क्षेत्राला पूरविल्या जाणाऱ्या खते व किटकनाशकांच्या अप्रमाणिततेमुळे लागवडी खर्च वाढून निव्वळ